# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील दुसरा रविवार – १६ जानेवारी २०२२

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः वंधू आणि भगिनीं म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना झालेल्या पाचारणाद्वारे ख्रिस्तसभेची निस्वार्थी सेवा करण्यास परमेश्वराची कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय नेत्यांनी कोरोनो ऑमिक्रॉनच्या वाढत्या फैलावावर मात करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत तसेच सद्य स्थिती हाताबाहेर न जाऊ देण्यासाठी योग्य ती उपाय योजना करावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. पवित्र मरियेच्या विनंतीवरून प्रभू येशूने काना गावी लग्नसमयी पाण्याचे द्राक्षारसात रूपांतर केले. आपल्या जीवनाचे परिवर्तन होण्यासाठी तसेच आपल्या रोजच्या जीवनातील सर्व समस्यांवर मात करण्यास आपल्याला पवित्र मरियेचे सहाय्य मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. परमेश्वराच्या मळयामध्ये कार्य करण्यासाठी ख्रिस्तसभेला तरूण तरूणींची गरज आहे. हे कार्य अखंडीतपणे पुढे नेण्यासाठी जास्तीत जास्त उमेदवारांना प्रेरणा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्वांवर विशेषकरून जे आजारी आहेत अशावर प्रभूचा वरदहस्त असावा, कोरोनो विषाणूपासून व सर्व नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे तसेच उदया/आज विवाहबद्ध होणा-या वधूवरांवर परमेश्वराचा आशीर्वाद यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रद्धेमधील उणिवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.